म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
दा. क्र. २५०२

२५०२

# पुनर्जन्म

IRBK-0102502
IRBK-0102502

महादेव शास्त्री जोशी

वा. क्र. २५०२

प्राचीन सुरस गोष्टी, भाग २ रा

# पुनर्जन्म

म. ग्रं. सं. ठाणे.
वा. शा. २०७
२५०२

लेखक :
पं. महादेवशास्त्री जोशी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. २५०२ नों. दि ..............
वि. वा. वा. ..............

सन १९४६

सोल एजंट
ज्ञानराज प्रक

IRBK 0102502
IRBK-0102502

मूल्य ८ आणे

# चार शब्द

प्राचीन सुरस गोष्टींचा हा तिसरा भाग प्रसिद्ध होत असलेला पाहून मला आनंद वाटणें साहजिक आहे. पहिले दोन भाग विद्यार्थीवाचकांना आवडले तसा हाहि आवडेल अशी आशा बाळगतों.

प्रत्येक माणसांत बऱ्या आणि वाईट अशा दोन्ही प्रवृत्ति असतात. या दोन्हींच्या मिश्रणानेंच मानवी स्वभाव बनलेला आहे. त्यांतच कांहीं लोक एका टोकाचे सज्जन तर कांहीं कमालीचे दुर्जनहि आढळतात. अशाच एका दुर्जनाची आणि एका महात्म्याची ही गोष्ट आहे. दुर्जन असतील ते सुधारावे, सन्मार्गाला लागावे असें सगळ्यांनाच वाटतें. पण उपेक्षा, तिरस्कार आणि शारीरिक शिक्षा यांनीं ते सुधारत नाहींत. निःस्वार्थ प्रेम आणि जिव्हाळा यांचा जर त्यांना साक्षात्कार घडला तर मात्र त्यांच्या जीवनांत आमूलाग्र क्रांति होते अशीं उदाहरणें आहेत. प्रस्तुत कथेचाहि शेवट असाच आहे.

हें पुस्तक श्री. वि. ह. दामले यांनीं इतक्या लवकर प्रसिद्ध केलें यावरून त्यांचा मजविषयींचा लोभच व्यक्त होत आहे. अर्थात् त्यांच्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करणें हें माझें कर्तव्य आहे. मुखपृष्ठावरचें चित्र चित्रकार देशपांडे यांनीं काढून दिल्याबद्दल व श्री. गानू यांनीं छपाईचें काम सुबक केल्याबद्दल त्या दोघांचे आभार मानतों.

**महादेवशास्त्री जोशी**

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

प्रकाशक :
**विद्याधर हरि दामले,**
नवीन किताबखाना,
बुधवार चौक, पुणें २

मुद्रक :
**श्रीपाद रघुनाथ राजगुरु,**
'राजगुरु प्रेस', कॉमनवेल्थ कॉलनी,
४०५ नारायण पेठ, पुणें २

म. ग्रं. सं. ठाणें.
५८.४१.२०३
२५०२

# पुनर्जन्म

भरतखंडाच्या मध्यप्रांतांत एक लहानसं पण टुमदार खेडं होतं. गांवाच्या पश्चिमेला एक मोठं तळं होतं. तें नेहमीं पाण्यानं तुडुंब भरलेलं असे. त्याच्या कडेकडेनं शेवाळाच्या गालिचावर कमळं हसत, डोलत. त्याच्या तीरावर मोठमोठे वृक्ष होते, ठेंगणीं झुडपं होतीं आणि हिरवळहि होती. तें तळं म्हणजे त्या खेड्याचं एक भूषणच होतं.

ऐन दुपारची वेळ होती. आपापल्या शेळ्यामेंढ्या घेऊन रानांत चारायला गेलेलीं गांवांतलीं पोरं तिथें येऊन तळ्याच्या कांठावर 'हुश्शऽऽ' करीत पडलीं होतीं. पोटभर पाणी पिऊन त्यांच्या शेळ्या तीरातीरानं चरत होत्या. गोवारी एकमेकांना गोष्टी सांगण्यांत रंगून गेले होते.

इतक्यांत एक चौदापंधरा वर्षांचा मुलगा सपासप् पाणी तोडीत पोहत पोहत तीरावर आला. जवळच एक शेळी तळ्याकडे पाठ करून एका झुडपाचा पाला खात होती. वरचा वरचा पाला तोडण्यासाठीं तिनं आपले पुढचे दोन पाय उभारले होते. त्या मुलानं एकाएकीं तिचे मागचे दोन पाय धरून तिला खालीं ओढली आणि पाण्यांत ढकलली. 'बँऽऽ बँऽऽ' असा एकच आवाज झाला. शेळीनं दोनतीन गटंगळ्या खाल्ल्या आणि राम म्हटला.

सगळे गोवारी ताडकन् उठले. तो मुलगा दुसऱ्या तीराकडे पोहून जात असल्याचं त्यांना दिसलं. दहा हातांनीं दहा दगड तळ्यांत भिरभिरले; पण एकहि त्या मुलाला लागला नाहीं. तो जो पाण्यांत बुडला तो पलीकडच्या कांठाला वर उमटला. तिथें उभा राहून तो या गोवाऱ्यांना वांकुल्या दाखवूं लागला. विकटपणें हसूं लागला. गोवारी दोन्ही बाजूंनीं त्याला धरायला धांवले, पण तो त्यांच्या हातीं लागला नाहीं.

ज्याची शेळी मेली होती त्याचं नांव होतं कुरंग. तो रडत ओरडत सुदेव ब्राह्मणाच्या घरीं गेला. गौतमाचा अधमपणा त्यानं त्याला सांगितला. सुदेवानं गौतमाला विचारलं, पण तो कबूल होईना. तो उलट कुरंगावरच कुरघोडी करूं लागला.

पण सुदेव ब्राह्मणानं खरा प्रकार काय आहे तें ताडलं. गौतमाचा स्वभाव त्याला माहीत होता. त्याला फार वाईट वाटलं. त्यानं एक सोन्याचं नाणं कुरंगाच्या हातावर ठेवलं आणि त्याची कशीबशी समजूत घालून त्याला घरीं पाठवून दिलं.

कुरंग गेल्यावर ब्राह्मणानं गौतमाकडे पाहून 'चांगलं करतोस बाबाऽऽ!' एवढेच उद्गार काढले व एक सुस्कारा सोडला. तो अधिक कांहींच बोलला नाहीं. आपला पोरगा मारण्याच्या आणि बोलण्याच्या पलीकडे गेला आहे हें त्याला समजून चुकलं होतं. लहानपणापासूनच असले अनर्थ-उत्पात करून त्यानं आपल्या आईबापांचा छळवाद मांडला होता. गांवांतल्या लोकांनाहि 'नको पुरे' केलं होतं. मुलानं कागाळी आणली नाहीं असा एकही दिवस जात नव्हता. प्रत्यहीं लोकांच्या हातापायां पडण्याची आईबापांवर वेळ येत होती.

सुदेव ब्राह्मणाचं गांवांत वजन चांगलं होतं. तो विद्वान् होता तसाच पापभीरु होता. सत्वशील होता तसाच दुसऱ्याच्या कामीं

झटणारा होता. लोक त्याला देवासारखा मान देत. त्याचा शब्द फुलासारखा झेलीत. पण या मुलाच्यामुळें त्याला गांवांत तोंड दाखवायची लाज झाली होती. गांवांतल्या लोकांनीं गौतमाला केव्हांच लंबे केला असता ; पण सुदेवाकडे पाहून ते आपला राग गिळीत होते.

कित्येक मुलगे सुदेवाच्या घरीं राहून वेदशास्त्रपारंगत होऊन गेले, पण गौतम एक अक्षरहि शिकला नाहीं. ना स्नान ना संध्या. ना आचार ना विचार. वाटेल तेव्हां वाटेल तें खायचं, वेळीं अवेळीं झोपा काढायच्या, आणि उरलेल्या वेळीं गांवांत भटकून लोकांना त्रास द्यायचा हा त्याचा नित्याचा व्यवसाय.

नानाप्रकारें समजावूनहि त्याच्या दुष्टपणाला आळा बसेना. जितकं बोलावं तितका तो अधिक चेवे आणि मारावं तितका अधिकच भडके. मुलगा नव्हे; तर गेल्या जन्मींचा कोणीतरी दावेदार आपल्या पोटीं जन्माला आला आहे, असं त्याची आई म्हणे. ‘ सूर्याच्या पोटीं शनैश्चर ’ असं गांवांतले लोक बोलत.

पुढें मोठा होऊन तारुण्यांत आल्यावर त्याच्या दुष्टपणाला आणि हिंसक वृत्तीला अधिकच धार चढली. एकाला हाताशीं धरायचं आणि त्याला दुसऱ्याशीं भांडण करायला लावायचं. दोघांचंहि नुकसान झालं कीं आपण टाळ्या पिटायच्या. त्याच्यामुळें शेजाऱ्या–शेजाऱ्यांत तंटे लागले. बापलेकांत विरोध माजले. नवराबायकोंत संशयाचं विष पसरलं. गांवांतली एकी बिघडली. अनेक तट पडले, मारामाऱ्या होऊं लागल्या. शांति आणि सलोखा नष्ट झाला.

मुलाच्या या दुष्ट वर्तनामुळें सुदेव ब्राह्मण खंगून खंगून मेला. त्याच्या पाठोपाठ माउलीहि निघून गेली. गौतमाला घर मोकळं

झालं. त्यानं त्या घरांत परोपरीचे छंद केले. बापानं मिळवून ठेवलेली धनाची पुंजी व्यसनापायीं उधळून टाकली. द्रव्य सपलं पण जडलेलीं व्यसनं शिल्लक राहिलीं. त्यांची तलफ भागवण्यासाठीं तो चोऱ्या करूं लागला. पुष्कळशा चोऱ्या पचल्या; पण एक दिवस पाप उघडकीला आलं. गांवांतल्या लोकांनीं त्याला यथेच्छ झोडपलं. आजवरच्या त्याच्या दुष्टाव्याचा गांवकऱ्यांनीं पुरेपूर सूड उगवला. त्या दिवशीं काळ्या रात्रीं लंगडत, कण्हत त्याला आपलं गांव सोडावं लागलं.

अंगीं कोणतीहि विद्या अथवा कला नसल्यामुळें भिक्षेवांचून त्याला कोणतंच चरितार्थाचं साधन नव्हतं. आणि भिकेनं त्याची भूक भागण्यासारखी नव्हती. अनेक गांवं तो भटकला पण त्याचं कुठेंच जमेना. कुठून तरी खूप पैसा मिळावा आणि आपली चैन चालावी हे विचार रात्रंदिवस त्याच्या मनांत घोळत होते; पण साधन मात्र सांपडत नव्हतं. एकदां अद्दल घडल्यामुळें पुन्हां कुठेंतरी डल्ला मारायला त्याचं भित्रं मन तयार होत नव्हतं.

एखाद्या गांवांत जावं, दोनतीन दिवस तिथें घालवावे आणि कांहीं जमेलसं वाटलं नाहीं कीं पुढें निघून जावं असा त्याचा कित्येक दिवस क्रम चालला होता. फिरतां फिरतां तो उत्तर दिशेला गेला. तिथें एका मोठ्या डोंगराच्या पायथ्याशीं त्याला भिल्लांची एक वसाहत आढळली. तें एक लहानसं भिल्ल आणि तसल्याच डोंगरी जातींचं राज्य होतं. डोंगराजवळूनच एक नदी वाहत होती आणि तिच्या कांठावर लांबच लांब ती वसाहत वसली होती. वृक्षांच्या राईत जागा सांपडेल तिथें भिल्लांनीं आपल्या हजारों झोंपड्या उठवल्या होत्या. एक मोठा पराक्रमी भिल्ल त्या वसाहतीवर राज्य करीत होता. दस्युराज या नांवानं लोक त्याला संबोधीत.

तो जेव्हां तिथें पोचला तेव्हां संध्याकाळ झाली होती. सूर्य नुकताच अस्ताला गेला होता. बायकापुरुष रानांतून घरीं येऊं लागले होते. कोणाच्या डोक्यावर लांकडांचे भारे होते. कोणाच्या खांद्यावर जाळीं होतीं. कोणाच्या खांद्यावर काठीला उलटी टांगलेली मृत पक्ष्यांची सांगड होती. कोणी हरिण तर कोणी ससे मारून पाठीवर टाकून आणीत होते. कोणी एका हातांत गळ आणि दुसऱ्या हातांत नदींत मारलेल्या माशांची गांथण घेऊन येत होते. पुरुषांच्याच नव्हे तर बायकांच्यासुद्धां खांद्याला तीरकमठा दिसत होता.

आईबापांनीं शिकार आणलेली पाहून पोरं हर्षानं त्यांच्याभोंवतीं कल्लोळ करूं लागलीं. कोणीं सशाचा कान धरला. कोणीं हरणाची तंगडी ओढली. कोणी माशांचे खवले उचकटूं लागलीं. तें ताजं मांसान्न पाहून पोरांच्या तोंडाला पाणी सुटलं. 'आई, भाज ना, आई शिजव ना, आम्हांला भूक लागली आहे,' अशी त्यांची भुणभूण सुरू झाली. एक म्हणे मी तंगडी खाणार तर दुसरं म्हणे मला पोटाचं मांस हवं. अखेर कांहीं मुलांत भांडणंसुद्धां जुंपलीं.

थोड्याच वेळांत अंधार पडला. अंगणाअंगणांतून शेकोट्या पेटल्या. घरांतलीं सगळीं लहानमोठीं माणसं शेकोट्यांभोंवतीं फेर धरून बसलीं. मारून आणलेल्या पशूंची कातडी सोलली गेली. एकेक अवयव सुऱ्यांनीं कचाकच तोडला गेला. बायकांनीं लोखंडी अणकुचीदार सळ्या सरसावल्या. एकेका तुकड्यांत सळी खुपसायची आणि तो आगट्यांत धरून भाजायचा. तें काम करतांना बायकांच्या काळ्याकुट्ट तोंडावरून घामाचे ओघळ ओतूं लागले. त्या जळत्या मांसाची आणि चरबीची दुर्गंधी वातावरणांत पसरली. ते खरपूस भाजलेले गरम गरम मांसखंड दोन्ही हातांत धरून पोरंबाळं फुंकून फुंकून खाऊं लागलीं.

गौतम एका मोठ्याशा झोंपडीपुढच्या अंगणांत येऊन बसला होता. तिथून त्याला हा सर्व देखावा दिसत होता. त्या धिप्पाड आणि क्रूर लोकांचं त्याला भय वाटूं लागलं होतं. रानडुकराला भाजलं तसं मलाहि हे भाजून खाणार नाहींत ना, अशी कुशंका त्याच्या मनांत डोकावूं लागली होती. आपण विचार न करतां भलत्याच ठिकाणीं आलों असा त्याला पस्तावा होऊं लागला होता. पण आतां तिथून निघून जाणं त्याच्या शक्तीबाहेरचं होतं. आजूबाजूला किर्र रान, काळामिट्ट अंधार, श्वापदांच्या डुरकाळ्या आणि प्रदेश अनोळखी. हातपाय न बांधतांच तो तिथें जखडल्यासारखा झाला होता.

ज्याच्या दारांत तो बसला होता तो भिल्ल स्वभावानं चांगला होता. अडाणी असला तरी त्याला आतिथ्यधर्म ठाऊक होता. आपल्याला भूक लागते तशी दुसऱ्यालाहि लागते, हें तो जाणत होता. त्यानं एक कसला तरी भाजलेला कंद आणि मांसाचा तुकडा एका मोठ्याशा पानावर घालून गौतमापुढें आणून ठेवला. भिल्लिणीनं वेळूचं नळकंडं पाण्यानं भरून आणलं.

" पाहुणे, गरिबाच्या घरचा हा ओलाकोरडा घास आहे. खा अन् पोटभर पाणी प्या. " तो म्हणाला.

गौतम सबंध दिवसभर उपाशी असल्यामुळें त्याच्या पोटांत कावळे कोकलतच होते. त्याला मांस खाण्याची संवय होती. पण तो सुका तुकडा कांहीं त्याच्या घशांत उतरेना. त्यानं तो कंद तेवढा खाल्ला आणि वर पाणी घोटलं. कशीबशी त्याची भूक शमली. तो खाऊन मोकळा होतो एवढ्यांत भिल्लानं एक घोंगडं आणि एक लांकडाचा गुळगुळीत चौकोनी तुकडा त्याच्यापुढें टाकला. अंथरा-

यला अन् पांघरायला एक घोंगडी पुरेशी होती आणि तो ठोकळा उशीसाठीं होता.

गौतम घोंगडी पसरून तिच्यावर लवंडला. भिल्लानं शेजारीं बसून त्याची चौकशी सुरू केली. गौतमाच्या तोंडून त्याची सगळी हकीगत ऐकल्यावर तो म्हणाला,

“ब्राह्मणमहाराज, तुम्ही उद्यां आमच्या दस्युराजाला भेटा. आमचा राजा गुणांचा चहाता आहे. हाताचा सढळ आहे. त्याचं भांडार सोन्यारुप्यानं आणि हिरेमाणकांनीं भरलेलं आहे. तुमच्या-सारख्या विद्वान् ब्राह्मणाचा तो आदर करील. तुम्हांला आपल्या पदरीं आश्रय देईल. तुमच्या सगळ्या इच्छा पूर्ण करील. तुमची खेप फुकट जाणार नाहीं.”

गौतमाला असंच कांहींतरी हवं होतं. त्याला एकदम श्रीमंती हवी होती. कांहीं काम न करतां चैन चालायला हवी होती. भिल्लाच्या बोलण्यानं त्याची आशा वाढली. अंथरुणावर पडल्या पडल्या तो उद्यांचीं मनोराज्यं करूं लागला.

थोड्याच वेळांत शेजारचीं माणसं त्या अंगणांत जमूं लागलीं. होतां होतां तें अंगण स्त्रीपुरुषांनीं भरून गेलं. भरपूर उजेडासाठीं हिंगणबेटाचं तेल घालून पलिते पाजळले गेले. कसल्यातरी रान-फुलांचं बनवलेलं मद्य घरमालकानं मधें आणून ठेवलं. सगळ्या लोकांनीं सभोंवतीं जमून ‘मला तुला’चा एकच गिल्ला केला. वेळूचीं मापटीं भरभरून बायका-पुरुष तें मद्य प्याले.

त्यानंतर नृत्याला प्रारंभ झाला. एकानं ढोल उचलून बडवायला सुरुवात केली. कांहींनीं आपले डमरू फडफडवले. कोणीतरी पाव्यां-तून सूर काढूं लागला. त्यासरशीं सगळ्यांनीं एकदम फेर धरून

नाचायला सुरवात केली. मनाला येईल तसं ते एकमेकांच्या हातांत हात किंवा गळ्यांत गळा घालून नाचूं लागले. त्याला ताल नव्हता



आणि लयहि नव्हती. होता तो मनाचा उत्साह आणि दणकट शरीरांत खुमखुमणारी मस्ती. ते नाच नाच नाचले. आपलीं शरीरं घुसळून टाकलीं. हास्यानं आणि आरोळ्यांनीं आसमंतांतलीं दऱ्याखोरीं घुमवलीं. पुरुष घामाघूम झाले. बायका अस्ताव्यस्त पडल्या. पलिते विझूं लागले. भिल्लगणांचाहि उत्साह थंड झाला. जमलेले लोक आपापल्या घरीं निघून गेले.

मध्यरात्र टळून गेल्यावर तो भिल्लवाडा शांत, निःस्तब्ध झाला आणि मग गौतमाला झोंप लागली. सकाळीं तो उत्साहानं उठला. तो आज दस्युराजाला भेटायला जाणार होता. 'दस्युराज विद्वान् ब्राह्मणांचा चाहता आहे' हे त्या भिल्लानं रात्रीं सांगितलेले शब्द त्याच्या

मनांत घोळत होते. त्याच्याजवळ कसलीहि विद्या नव्हती; पण त्यानं स्वार्थासाठीं तात्पुरतं विद्वान् व्हायचं ठरवलं. सोंगसंपादणी करून पहिल्या प्रथम तरी दुसऱ्यावर छाप टाकतां येते एवढं व्यवहारज्ञान त्याला होतं. पुढेंमागें दंभस्फोट झाला तरी त्याचीही त्याला पर्वा नव्हती. तो कीर्तीचा भुकेला नव्हता. त्याला हवं होतं तें द्रव्य!

तो नदीवर गेला. स्वच्छ स्नान केलं. जातांना शेकोटींतलं भस्म नेलं होतं तें अंगाला चोपडलं. केसांचा उभा जटाजूट बांधला. मृगचर्म परिधान केलं. कमंडलु जवळ होता तो पाण्यानं भरून घेतला. नदीच्या संथ पाण्यांत आपलं प्रतिबिंब पाहून तो स्वतःवर खुष झाला. 'वसिष्ठ-वामदेवांचे बाप शोभतों आपण आतां!' असं त्यानं मनाशीं म्हटलं.

दोन घटका दिवस होण्याच्या पूर्वीं तो दस्युराजाच्या वाड्यापुढें जाऊन उभा राहिला. देवडीवर दोन भिल्ल हातांत लांब भाले घेऊन उभे होते. त्यांच्या कमरेभोंवतीं पक्ष्यांच्या पिसांनीं मढवलेला लांडा लहंगा होता. उघड्या केसाळ छातीवर शंखांच्या आणि कवड्यांच्या माळा रुळत होत्या. कानांच्या भोकांत तांब्याचीं वळ्यं लोंबत होतीं. गौतमाला पाहून त्यांनीं चमत्कारिक चेहरा केला. आपल्या बटबटीत लाल डोळ्यांनीं त्याच्याकडे रोखून पाहिलं. एकानं तर आपले दांतहि विचकले. त्यांचा तो अवतार पाहून गौतम चांगलाच भेदरला. त्यानं कसाबसा धीर करून आपली आंत वर्दी द्यायला सांगितलं.

थोड्याच वेळांत तो दस्युराजाच्या पुढं जाऊन उभा राहिला. दस्युराजानं त्याला उत्थापन दिलं. हाताला धरून आसनावर आणून बसविलं.

"महाराज! कुठून येणं झालं? काय इच्छा आहे? आज आपले पाय लागल्यामुळें माझं घर पावन झालं. माझी पुण्याई फळाला आली." दस्युराज आदरानं मान लववून बोलला.

"दस्युराजा, तूं गुणिजनांचा चाहता आणि विद्वानांचा आश्रयदाता आहेस अशी तुझी कीर्ति ऐकून मी तुझ्याकडे आलों आहें. मी चारी वेदांचं अध्ययन केलं आहे. वेदांगं आणि उपनिषदं अभ्यासिलीं आहेत. व्याकरणांत माझा हात धरणारा कोणी नाहीं. तर्कांत मी गाढा पंडित आहें. माझं हें हृदय म्हणजे विद्यांचं अरण्य आहे. पण आज मी आपत्तींत पडलों आहे. माझे आईबाप स्वर्गवासी झाले. बायकापोरांनीं त्यांचाच मार्ग धरला. घरदार महापुरांत वाहून गेलं. शेतवाडी दुर्जनांनीं लुटली. त्या दिवसापासून वणवण भटकतों आहें. पृथ्वीचं अंथरूण आणि आकाशाचं पांघरूण करून झोंपतों आहें. आश्रय नसल्यामुळें मनाचं स्वास्थ्य गेलं. अन्न नसल्यामुळें शरीर कृश झालं. राजा, तूं तरी माझी सोय लावशील का? एका ऋषितुल्य ब्राह्मणाला आधार देऊन पुण्य जोडशील का?"

गौतमानं खऱ्याखोट्याची भेसळ करून दस्युराजाच्या डोळ्यांत चांगलीच धूळ फेंकली. अडाणी लोकांत पंडित म्हणून मिरवणं सोपं असतं. पारखी भेटेपर्यंत गारगोटीनं हिरा म्हणून खुशाल दिमाख दाखवावा. दस्युराज सज्जन होता. त्याला खोटं माहीत नव्हतं. लबाडीचा परिचय नव्हता. आपल्यासारखंच तो इतरांनाहि समजे. म्हणून तो गौतमाच्या वाग्जालानं फसला. त्याला त्याची दया आली. असा एक पंडितश्रेष्ठ आपल्या पदरीं असण्यांत भूषण आहे असं त्याला वाटलं. त्यानं गौतमाला म्हटलं,

"ब्राह्मणा, माझ्या घरीं धनदौलतीला तोटा नाहीं. मी तुमची सगळी सोय करतों. तुम्ही निश्चिंत असा."

आपल्या वाड्याशेजारींच त्यानं गौतमाला राहायला घर दिलं. धान्याचा पुरवठा केला. भांडींकुडीं दिलीं. कांबळीं आणि लोकरीचीं वस्त्रं धाडलीं. सेवेला एक दासी नेमून दिली. गौतमाची चैन सुरू झाली. दस्युराज त्याची रोज विचारपूस करूं लागला. आपल्याबरोबर रानावनांत शिकारीला नेऊं लागला. सगळे भिल्ल त्याला लवून प्रणाम करूं लागले. राजाचा पाहुणा राजाइतकाच बहुमान मिळवूं लागला.

त्याच्या घरची दासी. त्याचीं वस्त्रं धुई, त्याला अन्न शिजवून वाढी, अंग रगडी, पाय चेपी, सगळं कांहीं करी. ती काळी असली तरी तरुण आणि ठसठशीत होती. तिचा नवा धनी तिला आवडूं लागला. सगळ्या भिल्लबाड्यांत तोच एकटा काय तो गोरा आणि नाकीं डोळीं सुरेख होता. तिचं त्याच्यावर प्रेम बसलं. तोहि तिच्या घवघवीत तारुण्याला भुलला. थोड्याच दिवसांत तीं दोघं पतिपत्नीं-प्रमाणें राहूं लागलीं.

हळूहळू गौतमहि वृत्तीनं भिल्लच बनला. विद्वत्तेचं पांघरलेलं कातडं त्यानं फेकून दिलं. त्यांच्याप्रमाणें तोहि तिरंदाजी शिकला. सकाळीं उठावं, तीरकमठा घेऊन रानांत जावं, पशुपक्षी मारावे, नदीवर जाऊन मासे धरावे, भिल्लांबरोबर मद्य पिऊन धुंद व्हावं आणि त्यांच्याबरोबरच धिंगाणा घालावा असा त्याचा क्रम सुरू झाला. आठ आठ दिवस आंघोळ करीना कीं नेसतं वस्त्रहि बदलीना. त्याच्या केसांच्या जटा झाल्या आणि अंगावर मळाचे थर सांचले..

गौतमाचं हें अमंगळ वर्तन आणि ब्राह्मणाविरुद्ध आचार पाहून दस्युराजाचं मन त्याच्याविषयीं विटलं. अंतरींच्या सौजन्यामुळें त्यानं त्याला हांकलून दिलं नाहीं, पण त्याचा राजाश्रय बंद केला. त्यामुळें गौतमाला तिथें राहायचा कंटाळा आला.

इथून पळून जावं असा कित्येकदां त्याच्या मनांत विचार आला, पण त्यानं तो मोठ्या कष्टानं आवरून धरला होता. त्याला पळून जायचं होतं, पण तें रिकाम्या हातानं नव्हे, तर दस्युराजाच्या घरीं मोठा डल्ला मारून. दस्युराजाचा खजिना किती मोठा आहे, त्याची जागा कोणती, तिथें संरक्षणाची काय व्यवस्था आहे, इत्यादि गोष्टींची बारीकसारीक माहिती त्यानं आपल्या बायकोजवळून काढून घेतली होती. रोज रात्रीं लपतछपत तो दस्युराजाच्या घराच्या आसपास हिंडे. अनुकूल संधि मिळते का याची टेहेळणी करी आणि पहारेकऱ्यांची गस्त आणि त्यांचा तो सावधपणा पाहून निराशेनं घरीं परत येई. आपण धाडस केलं आणि तें उघडकीला आलं तर त्या क्रूर भिल्लांच्या हातून एका क्षणांत आपली मान धडावेगळी होईल हें तो पुरतेपणीं जाणून होता.

शेवटीं त्यानं आपल्या बायकोची मदत घ्यायचं ठरवलं. जें कांहीं साहस करायचं तें तिच्या हातून करवावं, साधलं तर दोघांचाहि फायदा. उघडकीस आलं तर बायकोचं काय व्हायचं तें होईल आणि आपल्याला अलगद निसटतां येईल, असा शहाणपणाचा विचार करून त्यानं आपल्या मनांतली गोष्ट भिल्लिणीला उघड करून सांगितली.

भिल्लीण एकदम चपापली. तिचे डोळे विस्फारले. छाती धडधडूं लागली. आजवर ज्याच्या घरीं पिंड पोसला त्याच्याच घरीं हें कृतघ्नतेचं कर्म करण्याचं तिनं साफ नाकारलं. पण गौतम कच्च्या गुरूचा चेला नव्हता. ती पहिल्याप्रथम आपली गोष्ट वाऱ्यावर उडवून देईल हें त्यानं आधींच हेरलं होतं. तसं झालं म्हणजे तिचं मन कसं वळवायचं, कसं बोलायचं, काय आमिष दाखवायचं

या सर्व गोष्टींची त्यानं तालीम करून ठेवली होती. तो आपल्या वाणींत शक्य तेवढा गोडवा आणि प्रेमळपणा आणून म्हणाला—

" हें बघ लाडके, अशी घाबरूं नको. दस्युराजाच्या घरांत तूं बरींच वर्षं वावरली आहेस, तिथला कानाकोपरा, वाटा, आडवाटा तुला ठाऊक आहेत, म्हणून मी ही जबाबदारी तुझ्यावर टाकतों. नाहींतर मीच पुढें झालों असतों. चैन भोगायची तर असलं कांहीं-तरी अचाट कर्म करायलाच हवं. अग, चोरी करण्यांत पाप कसलं आलं आहे ! मी कांहीं कोणाचा जीव घ्यायला सांगत नाहीं तुला. दस्युराजानं हिरेमाणकांनीं आणि सोन्याच्या नाण्यांनीं आपला खजिना भरला आहे, तो तरी वाटेच्या वाटसरूंना अन् श्रीमंतांना लुबाडूनच ना? मान हलवूं नको. मला सगळं माहीत आहे. त्याच्या घरची भोळीभाबडी मोलकरीण तूं. तुला काय कळणार आहेत असलीं कारस्थानं? तेव्हां मी म्हणतों कीं त्याच्या संपत्तींतून आपण थोडासा वांटा उचलला म्हणून त्याचं तरी काय मोठंसं नुकसान होणार आहे? आपली मात्र जन्माची ददात मिटेल. मग आपण एखाद्या नगरांत जाऊं. मोठं घर बांधूं. नोकरचाकर पदरीं ठेवूं. खाण्या-पिण्याची चंगळ उडवूं. मी राजा अन् तूं राणी ! तुला छान रंगी-बेरंगी साड्या चोळ्या घेईन. तुझ्या हातांत सोन्याच्या बांगड्या घालीन. नाकांत, कानांत, गळ्यांत, कमरेंत, पायांत सगळीकडे दागिन्यांनीं मढवून काढीन तुला. रथांत बसून तूं राजरस्त्यानं जाऊं लागलीस कीं लोक तुझ्याकडे टकमक पाहूं लागतील आणि म्हणतील कीं कोणा भाग्यवंताची ही नार असेल बरं ! '

आपल्या बोलण्याचा भिल्लिणीच्या मनावर काय परिणाम होतो तें गौतम प्रत्येक वाक्यागणिक पाहात होता. हळूहळू तिची चर्या

खुलत चाललेली जेव्हां त्याला दिसली तेव्हां त्यानं शेवटची मात्रा उगाळली.

" आतां तुला मुलं होतील. आपली मुलं गुटगुटीत दिसावीं, श्रीमंतींत वाढावीं, लोकांच्या डोळ्यांत भरावीं असं तुला वाटतं ना ? पैशावांचून हें कसं साध्य होणार सांग बरं ! एकदांच धाडस अन् जन्मभर सुख—"

भिल्लीण त्या कल्पनासाम्राज्यांत रंगून गेली. तिनं त्याचं म्हणणं ऐकलं आणि मग तीं दोघं घटकाभर हलक्या आवाजांत कांहींतरी बोलत बसलीं.

*   *   *   *

शुद्ध द्वादशीची रात्र होती. आकाशांत ढगांनीं गर्दी केल्यामुळें चांदणं निस्तेज झालं होतं. मध्यरात्र उलटून गेली होती. त्या भिलवाड्यांत सगळीकडे भयाण स्तब्धता पसरली होती. कुत्रींसुद्धा भुंकून भुंकून दमलीं होतीं कीं काय कोण जाणे ! अशा वेळीं दोन व्यक्ति एका घरांतून बाहेर पडल्या. त्या अंधुक प्रकाशांत चुकामूक होऊं नये म्हणून त्या एकमेकांना खेटून चालत होत्या. मधूनमधून एकमेकांचा हातहि धरीत होत्या. त्यांना आपल्या हृदयाची धडधड स्पष्टपणें ऐकूं येत होती. गौतम दुष्कृत्यांना सरावलेला होता, पण भिल्लीण पहिलंच पाप आचरायला आपलं पाऊल पुढें टाकीत होती. त्यामुळें तिच्या मनाची अवस्था मोठी विलक्षण झाली होती.

तिच्या मनश्चक्षूंपुढें भावी सुखाचे मनोरे उभारत होते आणि एखाद्या जाळींतून धपकन् श्वापदानं उडी टाकली कीं भयानें ते कोसळून पडत होते. ती चालतांना अडखळत होती. मध्येंच तिचा तोलहि जात होता. आपण मागं फिरावं, असल्या पापानं आपले हात

काळे करूं नयेत असं तिला तेवढ्या वेळांत कितीदां तरी वाटलं. एकदां तर ती थबकलीसुद्धां. पण गौतमानं घट्ट पकडलेला आपला हात सुटणं शक्य नाहीं, हें कळून आल्यामुळें तिचा निरुपाय झाला. तो जणुं आपल्याला कड्यावरून लोटून द्यायला नेत आहे, काळाच्या जबड्याकडे खेचीत आहे असं तिला वाटलं.

थोड्याच वेळांत तीं दस्युराजाच्या घराच्या पिछाडीला आलीं. तीं जिथें उभीं राहिलीं होतीं त्याच्या मागच्या बाजूस नदीचं पात्र वाहत होतं. समोर पंचवीस पावलांवर वाड्याचा तट उभा होता. त्याच्याकडेच तीं दोघं पाहत होतीं. तो तट चढून गेल्यावांचून त्यांचा कार्यभाग साधणार नव्हता. थोडा वेळ त्यांनीं इकडे तिकडे कानोसा घेतला. सगळीकडे सामसूम आहे याची खात्री पटल्यावर गौतमानं भिल्लिणीची पाठ थोपटली आणि तो दबत्या आवाजांत बोलला,

"वेळ कशी नामी आहे! आपला हेतु सफल होणार. तूं सुखाच्या राशीवर लोळणार. काळीज घट्ट कर. कचरूं नको. हं, चल हो पुढें!"

भिल्लीण तटाकडे निघाली आणि गौतम तिथेंच एका वेलींच्या जाळ्यांत शिरला. आपल्या दृष्टीच्या आड येणारीं पानं त्यानं भराभर ओरबाडून टाकलीं. दबकत दबकत पुढें जाणाऱ्या भिल्लिणीच्या अंधुक आकृतीकडे तो रोखलेल्या नजरेनं पाहात होता. ती तटाच्या पायथ्याशीं जाऊन थबकल्याचं त्याला दिसलं. पण बराच वेळ झाला तरी ती वर कां चढत नाहीं हें त्याला समजेना. तो अधीर होऊं लागला. 'थांबलीस काय वेंधळ्यासारखी, चढ कीं वर लवकर' असे शब्द त्याच्या तोंडून निघण्याच्या बेतांत आले होते. पण वेळींच त्याला आपली चूक कळून आली.

इतक्यांत ती आकृति एक हात वर चढल्याचं त्यानं पाहिलं आणि एक सुस्कारा सोडला. वर चढायला एखादी वेल किंवा एखादी



दोन दगडांमधली खांच हाताला लागते कीं काय तें ती पाहत असावी असा त्यानं कयास बांधला. आतां मात्र ती आकृति झरझर चढूं लागली. अर्धा तट तिनं गांठला हें पाहून त्याच्या उत्सुकतेचा पारा चढूं लागला.

"पण हें काय! उजव्या बाजूनं हा उजेड कसला? ही चुडणी पटवून कोण बरं इकडे येत आहे? अरेच्या! हा गस्तवाला भिल्ल दिसतो. येऊं दे पुढें. वाघासारखी झडप घालतों अन् गळाच दाबून टाकतों.

पण हे तर दोघे आहेत! आतां कसं करायचं! अन् त्यांच्या हातांतले ते भाले चुडणीच्या प्रकाशांत कसे लखलखत आहेत पाहा. आतां त्यांतला एक भाला भिल्लिणीच्या पाठींत घुसणार! पुरताच घात झाला."

गौतमाच्या मनांत असले विचार उठूं लागले आणि ते पहारेकरी अधिकाधिक जवळ येऊं लागले. पुढच्या क्षणीं काय देखावा दिसतो तें पाहाण्यासाठीं त्याचे पंचप्राण डोळ्यांत गोळा झाले. त्यांचे धपधप वाजणारे पाय आपल्याच छातीवर पडत आहेत असं त्याला वाटलं. ते ज्या वेगानं आले त्याच वेगानं पुढें निघून गेले. त्यांना कसलाहि संशय आला नाहीं अन् कोणाचीहि चाहूल लागली नाहीं. भिल्लीण त्या तटाच्या भिंतीला पालीसारखी चिकटून बसली आहे हें त्याला त्या प्रकाशांत दिसलं. तटाची भिंत काळी अन् भिल्लीणहि काळी. दोन्ही रंगांचं बेमालूम मिश्रण झालं होतं.

गौतमाचा जीव खालीं पडला आणि भिल्लीण सरसर वर चढली. पुढें एक घटका अशीच गेली. त्यानंतर तटाच्या भिंतीवर एक डोकं दिसूं लागलं. गौतमाला जरी स्पष्ट दिसलं नाहीं तरी त्या डोक्यावर एक गांठोडं होतं, आणि तें सावरतांना ज्या अर्थीं त्या भिल्लिणीला श्रम होत होते त्या अर्थीं तें बरंच अवजड होतं हें निश्चित. ती कशीबशी तटावर चढली मात्र; दगडाची एक अणकुचीदार कपार तिच्या पायांत ससकन् घुसली. तिचा तोल गेला अन् तटाच्या बाहेरच्या बाजूनें खालीं कोसळतां कोसळतां तिच्या तोंडून किंकाळी बाहेर फुटली. 'धप्प' असा आवाज झाला अन् तो वातावरणांत विरतो न विरतो तोंच तटावरून धडाधड् दोनतीन उड्या पडल्या. त्यांच्यापैकीं एक खुद्द दस्युराज होता अन् दोघे त्याचे शरीररक्षक होते.

' पहारेकरी ! ' दस्युराज मोठ्यांदां ओरडला. दोघांनीं त्या लप-लेल्या भिल्लिणीला घट्ट धरून ठेवलं. दस्युराजाच्या हांकेसरशीं पहारे-करी चुडण्या घेऊन धांवतच तिथें आले. भिल्लिणीला उठवून उभं करण्यांत आलं. तिच्या तोंडापुढें चुडणी धरतांच दस्युराजानं तिला ओळखलं.

' अरे, ही तर त्या अधम ब्राह्मणाच्या घरीं दिलेली मोलकरीण.' दस्युराज म्हणाला. त्यानं आधीं तिच्या श्रीमुखांत एक थप्पड लगा-वली अन् तिला म्हटलं, " तुला कां ग हे डोहाळे आठवले ? "

भिल्लीण कांहींच बोलेना. तिच्या डोळ्यांतून खळखळ अश्रु मात्र गळत होते आणि देह थरथर कांपत होता.

गौतम बसल्या जागेवरून हें सारं पाहात होता आणि कपाळाला हात लावून घेत होता. फळाला येऊं पहाणाऱ्या आपल्या आशा एकाएकीं धुळीला मिळालेल्या पाहून त्याला अनिवार दुःख झालं होतं.

" बोल ! बोलतेस का लगावूं दुसरी थप्पड ? हे पहारेकरी आपल्या चुडण्यांनीं तुला जिवंत भाजतील, ठाऊक आहे ना ? बोलली नाहींस तर हे भाल्याचे फाळ तुझ्या थोबाडांत खुपसून मला तुझी दांतखीळ उघडावी लागेल." दस्युराज राक्षसासारखा तिच्या अंगावर खेकसला. घाबरून भिल्लिणीच्या जिवाचं पाणी झालं.

" मऽऽमऽऽ मी नाहीं. मलाऽऽ त्याऽऽ त्यानं पाठवलं. बिरोबाची शप्पतऽऽ ! " कसेबसे एवढेच शब्द उच्चारून तिनं आपला निरपराधीपणा सिद्ध करण्याचा प्रयत्न केला.

" तो ? तो कोण ? तुझा दादला ? तो हलकट ब्राह्मण गौतम का ? "

तिनं नुसतं मानेनंच ' हो ' म्हटलं.

" कुठें आहे तो नीच भटुरगा ? सांग लवकर. त्याचीं खांडोळींच करतों या माझ्या तलवारीनं ! हराम उपकारकर्त्यांवर उलटतो ! खाल्ल्या पानावर—बोल, कुठं आहे तो ? " एक पहारेकरी दांतओंठ खात ओरडला.

भिल्लिणीनं आपल्या डाव्या हाताकडे बोट दाखवलं. गौतमानं तें पाहिलं. आतां आपण यांच्या हातीं लागलों तर आपलीं शंभर वर्षं भरायला वेळ लागणार नाहीं हें त्याला पक्कं कळून चुकलं. ते भिल्ल चुडण्या सरसावून त्याचा शोध करायला निघण्यापूर्वीच बसल्या जागेवरून त्यानं मागें पाऊल घेतलं. हलक्या पावलांनीं तो नदीच्या तीरावर आला. त्यानं हलकेच नदींत सुरकांडी मारली. पोहून पैलतीर गांठलं आणि तिथून धूम ठोकली. त्या निबिड अरण्यांतून वाट फुटेल तिकडे तो जात होता. उजाडेपर्यंत त्यानं बरीच मजल मारली. जी टेकडी तो चढत होता तिच्या माथ्यावर जाऊन त्यानं मागें वळून पाहिलं. उगवत्या सूर्याच्या प्रकाशांत, आपण भिल्लवस्तीपासून निदान चार कोस तरी दूर आलों हें जेव्हां त्याला समजलं, तेव्हां त्याच्या उरावरची भीतीची धोंड उतरली. 'जीविताच्या नाटकांतला एक प्रवेश संपला,' असं कायसंसं तो स्वतः-शींच पुटपुटला आणि त्यानं आपलं तोंड वळवलं.

निर्धास्त झाल्यामुळें त्याचीं पावलं आतां आपोआपच मंद पडत होतीं. रात्रभर शरीरावर अन् मनावर जो ताण पडला होता त्यामुळें तो फार थकला होता. कसाबसा झिंगल्यासारखा तो एकेक पाऊल पुढें टाकी. त्याच्या मनांत विचार उठत होते पण ते सुसूत्र आणि सलग नव्हते. मधूनमधून त्याला भिल्लवाड्यांतलं आपलं घर आठवे, ती भिल्लीण आठवे आणि तिचं तें अनावर आसक्त प्रेमहि आठवे. पण

आतां तें सारं भूतकाळांत जमा झालं होतं आणि भविष्यकाळ अजून पूर्ण अंधारांत होता. ‘पुढें काय?’ या प्रश्नाला अजून त्याच्यापाशीं उत्तर नव्हतं. आपण आतां कुठें जाणार हेंहि त्याला ठाऊक नव्हतं.

दिवसभर तो वणवण भटकला, पण कुठेंहि त्याला मनुष्यवस्तीचा आधार मिळला नाहीं. दिवस संपला. रात्र पुढें आली. आणि गौतमाला घनदाट अरण्यांत एका वृक्षाखालीं वसती करणं भाग पडलं.

त्या अरण्याची भयानकता तेवढी त्याला दिसत होती. त्याचं सौंदर्य प्रतीत होत नव्हतं. खरोखर तें रान अतिशय सुंदर आणि समृद्ध होतं. संध्याकाळच्या वेळीं फुलणारीं रानफुलं उमलून त्यांच्या वासानं वातावरण धुंद झालं होतं. तिथें गगनचुंबी वृक्ष होते. वेली एकमेकींत गुंफल्या जाऊन त्यांचे कुंज बनले होते. मधूनच हिरवीं-गार वेळूचीं झाडं माना उंचावून उभीं होतीं. कांटेरी असून सुंदर दिसणाऱ्या वेताच्या वेली कांहीं उभ्या तर कांहीं आडव्या पसरल्या होत्या. वृक्षांवर जागोजाग पक्ष्यांचीं घरटीं होतीं. त्यांतलीं बारकीं तांबूस पिलं, बाहेर तोंड काढून चिवचिव करीत आपल्या आयांना हांका मारीत होतीं. पक्षी मुक्कामासाठीं परतत असतांना आकाशांत दाटी करीत होते. पक्षिणी सर्वांच्या आधीं येऊन पिलांच्या चिमण्या मुखांत चाऱ्याचा घांस घालीत होत्या.

गौतम विषण्ण मनानं बसला होता. आपली ही रात्र कशी जाईल याची त्याला चिंता पडली होती. आपल्याला झोंप लागेल का? आणि लागली तर एखादं हिंस्र श्वापद येऊन झोपेंत असतांनाच आपल्याला गट्ट करणार नाहींना? जवळपास वारुळं असतील. त्यांत सापहि असतील. त्यांतलाच एखादा येऊन आपल्याला चावला तर

पुनर्जन्म 2402
दि.



काय करायचं? असल्या अनेक अभद्र शंकांनीं त्याचा जीव गोळा होत होता. माणसाला माणसाची किती गरज असते याची त्या वेळीं त्याला खरी कल्पना आली.

'आपण आपल्या उभ्या आयुष्यांत एकहि माणूस जोडलं नाहीं. सगळ्यांशीं दुष्टावा केला. अनेकांना छळलं. कित्येकांच्या पोटावर पाय आणले. कित्येकांचे संसार विसकटले. ज्यांनीं उपकार केले त्यांच्यावरच उलटलों. उद्यां मी एखाद्या दुर्धर प्रसंगांत सांपडलों तर माझ्यासाठीं उडी घालील असा एकहि जिवाभावाचा मित्र मला नाहीं.' ज्यांत अनुतापाची छटा आहे असे विचार प्रथमच आज त्याच्या मनांत येत होते. ते कायम टिकले असते, वाढीस लागले असते तर—?

आधींच अंधकारमय असलेल्या त्या रानांत आतां अधिकच काळोख पडूं लागला होता. एवढ्यांत भरभर असा पंखांचा आवाज वरून येऊं लागला. 'हें काय आणखी नवं संकट?' म्हणून गौतमानं पाहिलं. एक पांढरी शुभ्र आकृति गिरक्या घेत घेत गगनमंडळांतून खालीं उतरत होती. चार दोन क्षणांत ती आकृति तो जिथें बसला होता त्याच झाडाच्या आडव्या फांदीवर येऊन बसली. गौतमाची दृष्टि त्याच्याकडे होतीच. तो एक मोठा थोरला बगळा आहे हें त्याच्या शुभ्र रंगावरून, उंच मानेवरून आणि लांब चोंचीवरून त्यानं ओळखलं. तो खरोखरच एक बगळा होता आणि कश्यपाचा पुत्र होता. राजवाहन त्याचं नांव होतं. तो ब्रह्मदेवाचा मित्र असून नेहमीं त्याच्या सभेमध्यें जात असे. आतां तो तिथूनच आपल्या निवासस्थानीं परत आला होता. फांदीवरून त्यानं खालीं पाहिलं तेव्हां आपल्या घरीं कोणीतरी अतिथि आला आहे, असं त्याला समजलं.

"हे ब्राह्मणा, तुझं स्वागत असो. आज तूं माझ्या घरचा अतिथि आहेस. या घोर अरण्यांत एकाकी येऊन पडल्याबद्दल तूं मुळींच काळजी करूं नकोस. माझ्या हातून होईल तेवढं मी तुझं आतिथ्य करीन." राजवाहन म्हणाला.

तो खालीं आला. त्यानं आपल्या पायांनीं तिथला वरचा वरचा सुका पालापाचोळा गौतमाच्यापुढें गोळा केला. जवळच कुठें तरी एक झाड जळत होतं. तिथलं एक जळतं कोलीत चोंचींत धरून आणून त्या पाचोळ्याच्या ढिगावर ठेवलं. एकदम जाळ पेटला. आजूबाजूच्या काटक्याकुटक्या त्याच्यांत टाकल्या गेल्या. गौतमाच्या शेकोटीची व्यवस्था झाली. पुनश्च एकदां राजवाहनानं उड्डाण केलं. थोड्याच वेळांत पिकलेल्या रसाळ फळांनीं ओथंबलेली एक डहाळी त्यानं गौतमाच्यापुढें आणून ठेवली. गौतमानं अशीं फळं जन्मांत कधीं चाखलीं नव्हतीं. तृप्त होऊन त्यानं ढेकर दिली. एका पक्ष्यानें आपलं असं गोड आतिथ्य केल्याबद्दल त्याला नवल वाटलं. दुसरं नवल म्हणजे तो पक्षी असून मनुष्यवाणीनं बोलतो याचं.

भरल्यापोटीं गौतम शेकोटीकडे हातपाय शेकीत बसला असतां राजवाहनानं त्याला विचारलं कीं, 'तूं कोण ? कुठून आलास ? आणि इकडे येण्याचं प्रयोजन काय ?'

गौतम सांगूं लागला, "प्क्षिराजा, मी जातीनं ब्राह्मण आहें. माझं नांव गौतम. माझा संसार गरिबीचा असल्यामुळें मी धन मिळविण्यासाठीं देशपर्यटन करीत आहें. पण अद्यापि मला कोणी दाता भेटला नाहीं. हिंडून हिंडून पायांचे तळवे झिजले पण पांग फिटले नाहींत.

राजवाहनाला गौतमाची दया आली. तो म्हणाला,

" गौतमा, तूं चिंता करूं नको. उद्यां सकाळीं मी तुला यथेच्छ धन मिळेल असा एक नामी उपाय सांगेन."

गौतमाची चर्या आनंदित झाली. त्यानं राजवाहनाला अनेकवार धन्यवाद दिले. एवढं होईतों प्रहर रात्र झाली. गौतमाचे डोळे मिटूं लागले. गेल्या रात्रींचं अलोचन जाग्रण आणि दिवसभराचे अतोनात श्रम यांनीं तो अगदीं गळून गेला होता. केव्हां एकदां जमिनीला पाठ लागेल असं त्याला झालं होतं.

राजवाहनाला त्याची ही स्थिति कळून आली. सभोंवतीच्या झाडांची कोवळी पालवी खुडून त्यानं गौतमाकरितां मृदुशय्या बनवली. गौतम तिच्यावर झोंपला. झोंप लागेपर्यंत राजवाहन त्याला पंखांनीं वारा घालीत बसला. गौतम निद्रावश होतांच तोहि त्याच्या शेजारींच लवंडला.

गौतमाची ती रात्र सुखाची गेली. त्याला गाढ झोंप लागली. स्वप्नंसुद्धां पडलीं नाहींत. सकाळीं पांखरांच्या किलबिलाटानं तो जागा झाला. उठल्यावर आपले सगळे श्रम दूर झाले असून आपल्या अंगांत उत्साह संचरत आहे असं त्याला वाटलं. त्या रानाचं सौंदर्य त्या सुप्रभातीं त्याला कळून आलं. आपलं मन चांगलं तर सगळंच चांगलं !

'झोंप चांगली लागली ना ?' वगैरे कांहीं प्रश्न करून तो बगळा त्याला सांगूं लागला.

"मीं काय सांगतों तें नीट लक्ष देऊन ऐक. तुला धन हवं आहेना? ठीक आहे. माझ्या जवळ धन नाहीं. पण माझा एक मित्र खूप श्रीमंत आहे. त्याचं नांव विरूपाक्ष. जातीनं राक्षस असला तरी सुस्वभावी आहे. आतिथ्यशील आहे. धार्मिक आहे. इथून तीन योजनं पूर्वेला त्याचा किल्ला आहे. तूं त्याच्याकडे जा. राजवाहना-

कडून आलों आहें असं सांग. तो तुझा चांगल्या प्रकारें परामर्श करील. तुला गोड गोड पक्वान्नं खाऊं घालील अन् तूं मागशील तेवढं द्रव्य देईल."

गौतमानं राजवाहनाचा निरोप घेतला आणि त्यानं सांगितलेल्या दिशेनं तो निघाला. वाटेंत त्याला अमृतासारखीं गोड फळं खायला मिळालीं. चंदनवनांतून येणाऱ्या वायुलहरींनीं त्याला सुख दिलं. झुळझुळत्या झऱ्यांनीं त्याची तहान भागवली. वाटेंत मुक्काम करीत करीत तो राक्षसाच्या नगराजवळ जाऊन पोंचला.

त्या नगराचं नांव मेरुव्रज. तें एका खोऱ्यांत वसलं होतं.त्याच्या-भोंवतीं पर्वतांचा दुर्लंघ्य असा स्वयंभू तट होता. तिथली वनश्री डोळ्यांना आल्हाद देणारी होती. ती सुवर्णभूमि होती. जें पेरावं तें उत्तम पिके. आंत गेलेला माणूस झांकून जाईल इतक्या उंचीचीं शेतं तिथें मधून उभीं होतीं. भरघोस कणसांचं ओझं पेलत नसल्या-मुळें त्यांनीं आपल्या माना वांकवल्या होत्या. डोंगरमाथ्यावर उभं राहून खालीं दृष्टि टाकली कीं मधेंच शेतं, मधेंच झाडी, मधेंच हिरवींगार कुरणं अन् मधेंमधें झाडींतून अर्धवट दिसणारीं घरं, असं तें विहंगम दृश्य मनाला मोह घाली. गौतमाला तिथूनच त्या नगराची रम्यता पटली आणि केव्हां एकदां आपण खालीं उतरतों असं त्याला झालं.

पण खालीं उतरायला वाटच कुठें सांपडेना. त्यानं डाव्या उजव्या हाताला फिरून पाहिलं; पण जिकडेतिकडे तुटलेले कडे अथवा पाय ठेवला तर घसरगुंडी होईल अशी उभी उतरण. गौतम त्या येरझारीनं मेटाकुटीस आला. अखेर त्याला एक खिंड सांपडली. मेरुव्रजांत जाण्याचा तोच एक राजरस्ता होता.

तो त्या खिंडीच्या द्वारापाशीं जाऊन उभा राहतो तों खालून दोन राक्षस वर येत असलेले त्याला दिसले. त्यांचे ते अक्राळ-विक्राळ चेहेरे अन् ताडामाडासारखे उंच देह पाहून गौतमाची पांचावर धारण बसली. हे आतां आपल्याला खाऊन टाकतील कीं काय या भीतिनं तो कांपूं लागला.

पण ते त्याला खाण्यासाठीं आले नव्हते, तर त्याला सामोरे म्हणून आले होते. त्याला घेऊन जाण्याकरितां आले होते.

'राजवाहनमहाराजांकडून आलेला ब्राह्मण तो तूंच का?' एकानं आपल्या घुमणाऱ्या आवाजांत विचारलं.

'होय!' असं उत्तर देत असतांना 'यांना कसं कळलं?' हें आश्चर्य त्याच्या मुद्रेवर उमटलं होतं.

"चल तर आमच्याबरोबर. आमच्या राजानं तुला नेण्यासाठीं आम्हांला पाठवलं आहे." दुसरा म्हणाला.

'राजाला काय ठाऊक मी येणार आहें म्हणून?' हा प्रश्न धिटाई करून गौतमानं विचारलाच.

एका राक्षसानं तोंडावर विखुरलेले केस दोन्हीं हातांनीं मागें सारीत म्हटलं—

"अरे ब्राह्मणा, आमचा राजा मोठा जादूगार आहे. उभ्या पृथ्वींत कुठें काय चाललं आहे तें त्याला बसल्या जागेवरूनच कळतं. कुठें खुट्ट वाजलं तरी त्याच्या कानांवर आदळतं. तो मोठ्या मोठ्या देवांचाही बाप लागून गेला आहे."

'काय राव, खरं कीं नाहीं?' असं म्हणून आपल्या सोबत्याच्या पाठीवर थाप मारीत तो खदखदां हसूं लागला. डोंगरदऱ्यांतून त्याच्या त्या विकट हास्याचे प्रतिध्वनि उमटले. गौतम त्यांच्याबरोबर त्या

खिंडींतून खालीं निघाला. खिंडींतला रस्ता दगडांनीं बांधून काढलेला होता. मधेंमधें पायऱ्याहि केल्या होत्या.

नगराच्या मध्यभागीं विरूपाक्षाचा वाडा होता. तो जितका भव्य तितकाच मजबूत होता. त्याची तटबंदी मोठमोठ्या शिळांनीं उभारलेली होती. राक्षसांच्या जातीलाच शोभेल आणि शक्य होईल असं तें बांधकाम होतं. त्या वाड्यांत पाऊल ठेवतांच गौतमाचे डोळे दिपले. आंतल्या चौकांतले सगळे खांब रत्नजडित होते. पुष्कर, गोमेद, नील इत्यादि हिऱ्यांच्या विविध प्रकारांची कलाकुसर त्या चौकांत केलेली होती. पुढें विरूपाक्षाचा दिवाणखाना लागला. तो तर नाना रंगी प्रकाशकिरणांनीं लखलखत होता. तिथें मौल्यवान् आसनं मांडलेलीं होतीं. त्यांच्यावर हरणाचीं आणि वाघाचीं कातडीं पसरलेलीं होतीं. मद्यानं भरलेल्या सुवर्णाच्या सुरया अन् सुवर्णाचेच पेले. सोन्याच्याच उंच समया कोनाकोनांतून मंदपणें तेवत होत्या. कसला तरी एक धुंद सुवास त्या महालांत भरून राहिला होता. तिथल्या खांबांवर अनेक प्रकारचीं चित्रें कोरलेलीं होतीं; भिंतींवर रंगांनीं चितारलीं होतीं. त्या चित्रांतून देव-संस्कृतीचं हीनत्व आणि राक्षस-संस्कृतीचं श्रेष्ठत्व दाखवलं होतं. राक्षससमाजामधले आदर्श पुरुष भडक रंगांनीं त्यांच्या त्यांच्या विक्राळ स्वरूपांत रंगवले होते.

विरूपाक्ष आपल्या रत्नखचित उच्चासनावर बसला होता. त्याच्याभोंवतीं परिचारिका राक्षशिणींचा घोळका गडबड करीत होता. त्यांची वेषभूषा गौतमाला विचित्र वाटली. जेमतेम अर्ध्या मांड्या झांकल्या जातील असा एक रंगीबेरंगी दोन तीन हात तुकडा त्यांनीं कंबरेभोंवतीं गुंडाळला होता. तसलाच वीतभर तुकडा छातीभोंवतीं तंग आंवळलेला होता. त्यांच्या नाकांकानांत सुंकलींच सुंकलीं लोंब-

कळत होतीं. शंखांच्या आणि मण्यांच्या माळांनीं त्यांचे गळे भरून गेले होते. हातांत कोपरापर्यंत कंकणं चढवलेलीं होतीं. त्यांचे देह



रांकट आणि बाटोळे गरगरीत होते. अंगात जवानी होती. डोळ्यांत धुंदी होती. चालण्याबोलण्यांत मद होता.

एकटी त्याच्यासमोर पुष्पगुच्छ ठेवीत होती. दुसरी त्याला चंदनाची उटी लावीत होती. तिसरी बिंझणवारा करीत होती. चवथी पात्रांत मद्य ओतीत होती. सर्वजणी कोणत्याना कोणत्या प्रकारें त्याची परिचर्या करीत होत्या.

विरूपाक्षाचा प्रचंड देह त्या आसनावर ऐसपैस पसरला होता. मौल्यवान् वस्त्राभरणांनीं तो नटला होता. त्याच्या गोल अन् उथळ डोळ्यांत उग्रपणा आणि सौम्यपणा यांचं विलक्षण मिश्रण झालेलं होतं. त्याचा जबडा कोणाच्याहि हृदयांत धडकी उत्पन्न करील इतका कठोर होता. कपाळावरच्या आंठ्या आणि हातांपायांवर उठलेल्या शिरा त्याच्या भेसूरपणांत अधिकच भर घालीत.

गौतमाला पाहिल्याबरोबर विरूपाक्षानं त्याला 'स्वागतम्' म्हटलं. त्याला बसायला आसन दिलं. नांव काय? गोत्र काय? अध्ययन काय? याची पृच्छा केली.

गौतमाला या वेळीं मात्र खोटं सांगण्याचा धीर झाला नाहीं. त्यानं नम्र होऊन सांगितलं—

"महाराज, मला गौतम असं म्हणतात. मध्यदेशांत माझा जन्म झाला. माझे आईबाप ब्राह्मण होते यापलीकडे माझ्या कुळगोत्राची मला कांहींच माहिती नाहीं. मी भिल्लवस्तींत बराच काळ राहिलों. एका भिल्लिणीशींच लग्न केलं. मला वेद येत नाहींत आणि शास्त्रांचा गंधहि नाहीं. मी निरक्षर मनुष्य आहें. एकादी कोणती कलाहि माझ्या अंगीं नाहीं. तुम्ही भरपूर द्रव्य द्याल या आशेनें रानं तुडवीत, डोंगरदऱ्या ओलांडीत इथें आलों आहें. राजवाहनानं तुमच्या औदार्याची प्रशंसा करून मला इथं पाठवलं आहे."

विरूपाक्ष क्षणभर विचारांत पडला. "या मूर्खाला धन काय म्हणून द्यायचं! हा केवळ जातीनं ब्राह्मण आहे, विद्या नाहीं ती नाहींच, पण ब्राह्मण्याचे संस्कारहि याच्या मनबुद्धीवर नाहींत. कुपात्रीं दान केल्यानं पुण्यापेक्षां पापच लागेल मला. मीं दिलेलं धन, हा दुराचारी अधम नानाप्रकारच्या व्यसनांत उधळून टाकील. वाटतं कीं, याला धक्के देऊन नगराच्या बाहेर घालवावा. याला एक कवडीसुद्धा देऊं नये. पण काय करूं! माझ्या मित्रानं याला मजकडे धाडलं आहे. याचा नसला तरी त्याचा तरी मान मला ठेवलाच पाहिजे. राजवाहन बिचारा भोळा. त्याला सज्जन दुर्जन कळत नाहींत. खरं कुडं पारखतां येत नाहीं. तो आपल्या मापानं जग मोजतो. माझ्यासारखी जर त्याला अंतरंगपरीक्षा असती तर त्यानं या अधमाला, वाऱ्यालासुद्धां उभं केलं नसतं."

विरूपाक्ष एकदम स्तब्ध कां बसला हें चोरट्या नजरेनं गौतम अजमावीत होता. थोड्या अवधींत पण बऱ्याच वेळां राक्षसाच्या डोळ्यांत एक विषारी चमक उठली अन् मावळली असं त्याला दिसून आलं. भीक नको पण कुत्रा आवर, अशी तर आपली गत होणार नाहींना, अशी त्याला धास्ती पडली.

राक्षस म्हणाला, "गौतमा, आज कार्तिकी पौर्णिमा आहे. त्रिपुरी म्हणतात तें हिलाच. दरवर्षी आमच्याकडे या दिवशीं ब्राह्मणभोजन असतं. आतां थोड्या वेळानें ब्राह्मण येतील. तूंहि त्यांच्या पंक्तीला बैस. त्यांना मी जें द्रव्य देईन तेंच तुलाहि देईन. जा, आतां स्नान कर. तिकडे सर्व तयारी आहे."

दुपार होऊं लागली तसतसे ब्राह्मण येऊं लागले. कोणी जटापाठी, कोणी घनपाठी, कोणी षट्शास्त्री, कोणी वैयाकरण, कोणी याज्ञिक असे नानाविद्यांचे ब्राह्मण नाना देशांतून तिथें आले. एकमेकांच्या ओळखी झाल्या. तुमचा देश कसा, आमचा देश कसा अशीं बोलणीं निघालीं. शास्त्रार्थाची चर्चा सुरू झाली. शंका-समाधान होऊं लागलं. कोणीं कसे शिष्य पढवले, कोणीं किती यज्ञांत अध्वर्यूचं काम केलं, कोण कोणत्या गुरुपरंपरेचे इत्यादि विविध विषयांवर संभाषणाची रंगत उडूं लागली. गौतम तिथेंच एका कोपऱ्यांत चोरासारखा बसला होता. तो अशिक्षित असल्यामुळें त्याला त्या संभाषणांत भाग घेतां येत नव्हता. त्याच्याकडे कोणाचं लक्षहि नव्हतं.

थोड्या वेळानें एका प्रशस्त भोजनमंडपांत भोजनाची तयारी सुरू झाली. सोन्याचीं ताटं अन् त्यांना आधारपत्र म्हणून केळीचीं पानं मांडलीं. रांगोळ्या काढल्या. बसायला पाट ठेवले. ब्राह्मण सोंवळीं नेसून पाटावर बसले. वाढपी वाढूं लागले. चटण्या, कोशिंबिरी,

भाज्या, नानापरींच्या खिरी, पक्वान्नं इत्यादि पदार्थ क्रमानं एका-मागून एक ताटांत येऊं लागले.

सुगरिणींनीं बनवलेल्या त्या भोज्यपदार्थांचा घमघमाट ब्राह्मणांच्या नाकांना स्पर्श करूं लागला. वैदिकांनीं माध्यान्ह सवनांत अन्नसूक्तांचं पठण आरंभिलं. अनेकांनीं सुरांत सूर मिसळून म्हटलेले ते वेदमंत्र राक्षसाला श्रवणीय वाटले. त्याच्या मुद्रेवर हर्ष दिसूं लागला. वाढणं संपलं. अन्नशुद्धीची तुपाची धार भातावर पडली. ब्राह्मणांनीं संकल्प सांगितला. राक्षसानं पानं प्रोक्षण करून उदक सोडलं.

ब्राह्मण जेवूं लागले. राक्षस प्रत्येकाच्या पानापुढें उभा राहून 'सावकाश होऊं द्या', 'सुखेन भोक्तव्यम्' असं नम्रपणें सांगूं लागला. थोड्या वेळानं आग्रह सुरू झाला. ब्राह्मणांनीं 'नको नको'चा मंत्र घेतला. राक्षस 'घ्या घ्या' म्हणूं लागला. सगळे आकंठ जेवले. शेवटीं जुईच्या कळ्यांसारखा मऊ मोकळा भात आला. त्याच्या पाठोपाठ सायीसकट घट्ट, मधुर दहीं वाढलं गेलं. जलप्राशन करून आपोष्ण्या घेतल्यावर पंगत उठली.

विडे खाऊन झाल्यावर ब्राह्मणांनीं आशीर्वादमंत्र म्हटले. विरू-पाक्षानं मंत्राक्षता घेतल्या आणि सर्वांना साष्टांग नमस्कार घातला. 'तुझी अशीच भरभराट होवो! तुझे सकल मनोरथ परिपूर्ण होवोत!' असे ब्राह्मणांच्या तोंडून स्वयंस्फूर्त उद्गार निघाले. अजून दक्षिणेचा मुख्य तो कार्यक्रम राहिलेला होता. विरूपाक्षानं आपल्या मंत्र्याला इशारा दिला.

लगेच राक्षसाच्या सेवकांनीं द्रव्याच्या राशीच्या राशी आणून ब्राह्मणांच्या पुढें ओतल्या. त्या राशींत सोन्याच्या मुद्रा होत्या. मोत्यें होतीं. हिरेमाणक, रत्नं सगळं कांहीं सरमिसळ होतं. तें अपार वैभव

पाहून ब्राह्मणांचे डोळे दिपले. जिकडे तिकडे रत्नांचा प्रकाश पसरला. सर्वांना हात जोडून राक्षसानं सांगितलं—

"हें माझं भांडार तुमच्या पायांशीं मीं ओतलं आहे. यांतलं तुम्हांला हवं तेवढं द्रव्य तुम्ही घेऊन चला. हात आवरूं नका. संकोच करूं नका. तुम्ही सरस्वतीचे भक्त आहां. विद्या मिळविण्यासाठीं, ती टिकविण्यासाठीं अन् शिष्यांना तिचं दान करण्यासाठीं तुम्हीं आपले देह झिजवले आहेत. रक्त आटवलं आहे. भोगविषयांवर लाथ मारली आहे. तुम्ही जगाला प्रकाश देणारे ज्ञानदीप आहां. हे दिवे सतत तेवत राहावे, अधिक उज्ज्वल व्हावे म्हणून आमच्यासारख्यांनीं त्याला द्रव्याच्या तेलाचा पुरवठा करीत राहिलें पाहिजे. ज्ञानी पुरुषांनीं दरिद्री, दैन्यवाणं असतां कामा नये. कुटुंबभरणाची दगदग त्यांना पडतां कामा नये. त्यांनीं आजन्म फक्त एकच उद्योग करावा. ज्ञान मिळवणं आणि ज्ञान देणं! म्हणूनच मी हें यथाशक्ति द्रव्यदान करीत आहें—"

ब्राह्मणांना त्याचं हें भाषण विचारपूर्ण वाटलं. त्यांनीं माना डोलवल्या. 'तुझ्यासारखा दाता तूंच!' म्हणून त्याचं गौरव केलं. 'राक्षसकुलांत जन्मून तूं त्याला पावन केलंस!' अशी सर्वांनीं त्याची प्रशंसा केली. कित्येकांचे नेत्र तर प्रेमाश्रूंनीं भरून आले.

कोणी मूठभर, कोणी पसाभर, कोणी भांडंभर असं द्रव्य त्या राशींतून उचललं. राक्षस आणखी घ्या म्हणत होता; पण कोणी हावरेपणा दाखवला नाहीं. गौतमाला मात्र धीर निघाला नाहीं. इतकं विपुल धन त्यानं कधींच पाहिलं नव्हतं. त्याचीं सगळीं स्वप्नं आज सत्यसृष्टींत उतरणार होतीं. ब्राह्मण उठल्यावर त्यानं वेळ लावला नाहीं. इतरांनीं सगळं लुटून नेलं तर आपल्या वांट्याला कांहींच उरणार नाहीं या भीतीनं तो लोकांना मागें रेटीत गर्दींत

घुसला. एक मोठं वस्त्र पसरलं आणि दोन्ही हातांनीं द्रव्य ओढूं लागला. त्याचं कोणाकडे लक्ष नव्हतं; पण राक्षसाचं मात्र त्याच्याकडे होतं. त्याच्या या अतिलोभाचा त्याला राग आला. पुन: एकदां ती विषारी चमक त्याच्या डोळ्यांत उठली. पण पक्षिराज मित्राचं स्मरण होऊन त्यानं आपलं मन आंवरलं.

लगबग करून गौतमानं धनाचं गांठोडं बांधलं. तें एकदां दोन्ही हातांनीं उचलून पाहिलं. आपल्याला हें नेतां येईल असा अजमास करून त्यानं तें मोठ्या शिकस्तीनं डोक्यावर घेतलं अन् तो निघाला. विरूपाक्षाचा निरोप घेण्याचा शिष्टाचार पाळण्याचंसुद्धां त्याला भान राहिलं नाहीं. सर्व ब्राह्मण त्याच्या या आचरटपणाला हसले. ज्यानं त्यानं एकमेकांना खुणावून आपली नापसंती व्यक्त केली.

गौतम शक्य तेवढी जलदी करुन त्या खोऱ्याच्या बाहेर आला. आपल्याजवळचं धन कोणीतरी राक्षस हिरावून घेईल अशी त्याला भीति पडली होती. डोंगरमाथ्यावर आल्यानंतर त्यानं एका दगडावर बसून थोडा वेळ विश्रांति घेतली. आपलं गांठोडं सोडून त्यानं त्या द्रव्यराशीकडे आशाळभूतपणें निरखून पाहिलं. त्यांतल्या हिरेमाणकांची बाजारांत काय किंमत येईल अन् आपण किती श्रीमंत होऊं याचा मनाशींच अंदाज बांधला. पुनश्च तें गांठोडं डोक्यावर घेऊन तो मार्ग चालूं लागला.

त्याचे पाय चालत होते, पण मन कल्पनेच्या साम्राज्यांत विहार करीत होतं. आतां आपण कुठल्या देशांत जायचं, घर कसं बांधायचं लग्न कशा मुलीशीं करायचं, कसकशी चैन करायची, नोकर चाकर किती ठेवायचे, याचा आराखडा तो आपल्या मनाशीं तयार करीत होता. जन्मांत कधीं झाला नव्हता एवढा आनंद आज त्याला झाला होता. आज त्याच्या आशेला भरघोस फळं आलीं होतीं.

राक्षसाच्या नगरींतून निघाल्यापासून दुसऱ्या दिवशीं अस्तमानीं तो परत त्या पक्ष्याच्या निवासस्थानीं आला. या वेळीं तो खूप दमला होता. तें ओझं त्याला असह्य झालं होतं.

झाडाचं एक मोठं पान तोडून गौतम वारा घेत बसतो आहे तोंवर राजवाहन आकाशांतून गिरक्या घेत खालीं उतरला. मागच्या खेपेप्रमाणेंच याहि खेपेला त्यानं त्याला शेकोटी पेटवून दिली व सर्व प्रकारचं आतिथ्य केलं. गौतम तृप्त होऊन शेकोटी-जवळ झोंपल्यावर तो पक्षीहि त्याच्या पायांगतीं लवंडला. त्या दिवशीं गौतमाला लवकर झोंप आली नाहीं. कसाच डोळा लागेना म्हणून तो उठून बसला. सहज राजवाहनाकडे त्याची दृष्टि गेली. तो दुधासारखा शुभ्र पक्षिराज निःशंकपणें झोंप घेत होता. गौतमाला वाटलं, किती विशाल देह आहे याचा!

आणि या कल्पनेसरशीं त्याचं विचारचक्र निराळ्याच दिशेनं फिरूं लागलं. गेले दोन दिवस आपल्या पोटाचे हाल झाले. मध्य-देशांत जाईपर्यंत अजून किती तरी दिवस प्रवास करावा लागेल. आपल्याजवळ कांहीं शिदोरी नाहीं. वाटेंत भूक लागेल तिथें खायला मिळेलच याचा काय भरंवसा? अन् पोटालाच जर मिळालं नाहीं तर हें अवजड ओझं कसा वाहून नेणार मी! तेव्हां आपण या पक्ष्याला मारावं. मला अगडबंब आहे. याच्या मांसावर चार दिवस तरी आपली ददात मिटेल. पुढचं पुढें!

लगेच त्यानं शेकोटींतलं एक मोठं जळकं लाकूड उचलून त्या पक्ष्याच्या डोक्यांत घातलं. त्या एकाच घावानं गौतमाचं इष्ट कार्य झालं. तीन प्रहरांसाठीं झोंपलेला तो पक्षी कायमचाच झोंपला. ना विवळणं ना तळमळणं! पंखांवांचून त्याचा प्राणपक्षी उडून गेला!

हें अधम कर्म आचरतांना गौतमाच्या डोळ्यांत उठलेली आग त्या शेकोटीच्या आगीपेक्षाहि प्रखर होती! एका महान् विभूतीचा त्यानं संहार केला होता. पक्षी नव्हे तर मूर्तिमंत दया जाळली होती. एक परोपकारी आतिथ्यशील धर्मात्मा जगांतून नाहींसा केला होता!



राजवाहन मेला असं समजतांच तो पुढच्या तयारीला लागला. त्यानं त्याचे दोन्ही सुंदर पंख कचकन् उपटून बाजूला फेंकले. त्या-खालचीं मऊ मऊ पिसं उपसून खालीं रास घातली. बिस्तवावर परतून लव जाळून घेतली. जवळचाच एक धारदार दगड घेऊन

त्याच्या तंगड्या अन् मान तोडून टाकली. आणि मग उरलेला तो तांबडा थलथलीत मांसाचा गोळा शेकोटींत खमंग खरपूस भाजून काढला. त्यांतला एक कढतसा तुकडा खाऊन पाहून तें मांस चवदार असल्याची खात्री करून घेतली. पानांत गुंडाळून तो पदार्थ घट्ट बांधून उशाशीं ठेवून दिला अन् मग स्वस्थ चित्तानं भूमीवर अंग टाकलं. आतां त्याला ताबडतोब झोंप आली.

सकाळीं उठतांच गौतमानं आपला मार्ग धरला. आतां त्याच्या माथीं एकावर एक दोन ओझीं होतीं. आज भुकेविषयीं तो निर्धास्त होता. पण आपल्या पाठीमागें काय घटना घडत आहेत आणि आपण केलेल्या कृतघ्न कर्माचं प्रायश्चित कोणत्या प्रकारें आपल्याला मिळायचं आहे याची त्याला कल्पनाहि नव्हती.

विरूपाक्ष राक्षस आणि राजवाहन पक्षी हे दोघे मित्र होते हें मागें सांगितलंच आहे. त्यांची बहुधा एक दिवसाआड तरी गांठ पडे. राजवाहन ब्रह्मसभेंतून परत येतांना विरूपाक्षाच्या घरीं उतरून अन् त्याच्याशीं सुखदु:खाच्या चार गोष्टी बोलून मग आपल्या निवास-स्थानीं येई. कोणत्या तरी कारणानं राजवाहनाची जर दोन दिवस भेट झाली नाहीं तर विरूपाक्ष बेचैन होई.

गेले दोन दिवस राजवाहन त्याला भेटला नव्हता. तो कां आला नाहीं याचं त्याला गूढ पडलं होतं. त्यानं त्याच्या समाचारासाठीं दोघां राक्षसांना पाठवलं होतं. ते येऊन पाहतात तों त्यांना राज-वाहन न दिसतां त्याचे तुटलेले पंख आणि इतर कांहीं भग्न अवयव तेवढे दिसले होते. त्यांनीं परत जाऊन विरूपाक्षाला ही हकीगत सांगितली होती.

विरूपाक्ष दु:खांत पडला होता. राजवाहनाचा मृत्यु कसा झाला हें त्याला बराच वेळ आकलन झालं नव्हतं. विचार करतां करतां त्याला

गौतमाची शंका येऊं लागली होती. गौतम असलं नीच कृत्य करायला कचरणार नाहीं असं त्याचं मन त्याला सांगूं लागलं होतं. 'होय! हें गौतमाचंच काम!' अशी खात्री होऊन तो उठला होता. त्यानं आपल्या मुलांना आज्ञा केली होती कीं, त्या हरामखोराला असेल तेथून पकडून आणा! आणि आतां चार घोडेस्वार गौतमाचा पाठलाग करीत दौडत होते.

मध्यान्हाची वेळ झाली होती. शरदृतूंतलीं ऊन्हं रखरखत होतीं. सकाळपासून गौतमानं चार कोस मार्ग तोडला होता. आतां तो दमून भागून एका झऱ्याच्या कांठीं झाडाखालीं बसला होता. आणि भूक शमवण्यासाठीं त्यानं नुकताच मांसाचा पुडा सोडला होता.

इतक्यांत त्याला घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकूं आला. तो एकदम दचकला. हे कोण घोडेस्वार असावेत याची त्याला कल्पना येईना. 'कोणी असोत; आपण आपलं सावध असावं' म्हणून त्यानं धनाचं गाठोडं आधीं पाल्यापाचोळ्यांत पुरून ठेवलं. एवढं झाल्यावर रडकी, दीनवाणी मुद्रा करून तो आपल्या जागीं बसला. हेतु हा कीं, हा कोणी तरी दुःखी प्राणी आहे असं समजून त्यांनीं आपल्या वाटेला जाऊं नये.

एवढ्यांत ते स्वार अगदीं जवळ आले! 'अरे, हे तर राक्षस!' गौतमाच्या तोंडून अस्फुट उद्गार निघाला. त्याची कंबरच खचली. हे आपलाच पाठलाग करीत आले आहेत याची त्याला खात्री पटली. सांपडला रे सांपडला, म्हणून त्यांनीं घोड्यावरून पटापट उड्या टाकल्या. चौघांनीं येऊन त्याला घेरलं. एकानं त्याची मानगूट पकडली अन् विचारलं—

"हें काय आहे तुझ्या पुढ्यांत?"

"पक्ष्याचं मांस...." गौतमानं चांचरत उत्तर दिलं.

"कोणत्या पक्ष्याचं ?"

"राजवाहनाचं!" गौतमाला सांगणंच भाग पडलं.

"विश्वासघातकी! कृतघ्न! बांधा रे याला." त्यांच्या म्होरक्यानं आज्ञा केली.

राक्षसांनीं तिथल्याच वेली ओढून काढल्या आणि गौतमाचे हात-पाय करकचून बांधले.

"धनाचं गांठोडं कुठं आहे?" म्होरक्यानं विचारलं.

गौतम बोलेना. फटके दिले, ठोसे लगावले, तरी दांतखीळ उघडीना. शेवटीं जेव्हां म्होरक्यानं लखलखीत सुरा बाहेर काढला अन् छातीवर रोखला, तेव्हां त्यानं तें पुरून ठेवल्याची जागा सांगितली. राक्षसांनीं तें तिथून काढलं आणि आपल्या स्वाधीन करून घेतलं.

थोड्याच वेळांत घोडेस्वारांनीं गौतमाला विरूपाक्षासमोर उभं केलं. त्याच्यावर नजर जातांच विरूपाक्षाचे दांत करकर वाजूं लागले.

"राजवाहनाला तूं मारलंस का?" विरूपाक्षानं गर्जून प्रश्न केला.

गौतमाच्या वाणींत त्राण नव्हतं. तो जिवंत असून मेल्यासारखा झाला होता. त्याचं तोंड कोरडं पडलं होतं. जीभ उचलत नव्हती. निस्तेज डोळ्यांनीं तो फक्त विरूपाक्षाच्या तोंडाकडे पाहात होता. जणुं वाघाच्या पुढें बांधलेला बकरा!

"ओढा रे फटका त्याच्या पाठीवर!" राक्षस पुन्हां गरजला.

त्याच क्षणीं एक आवाज कडकला. गौतमाच्या पाठींतून रक्ताची चिळकांडी उडाली. 'अयाऽऽ यीऽऽ' असा एक हृदयभेदक चीत्कार गौतमाच्या तोंडून बाहेर पडला. तो म्हणाला,

"होय महाराज! मींच राजवाहनाला मारलं! मी चुकलों! विश्वासघात केला! कृतघ्नपणा आचरला! मी पुन्हां असं करणार नाहीं. एक वेळ मजवर दया करा."

"बस कर बटवट!" विरूपाक्ष त्याला थांबवून म्हणाला. "दया! दयेची भीक मागण्याचा तुला काय अधिकार आहे? दया शब्द तुझ्या तोंडीं शोभत नाहीं. कृतघ्नावर, विश्वासघातक्यावर कधींहि दया करूं नये. यमाच्या दरबारींसुद्धां या अपराधांना कडक शासन आहे. नरकांत पिचत पडलेले प्राणी एक दिवस ना एक दिवस तरी तिथून सुटतात; पण कृतघ्न आणि मित्रद्रोही प्राण्याला 'यावच्चंद्रदिवाकरौ' तिथें यातना भोगाव्या लागतात. एक कृतघ्न आणि घातकी माणूस मोकळा सुटला तर शंभर लोकांच्या भरल्या संसारांना तो आग लावतो. आजवर तूं हेंच केलंस. राजवाहनाचा जीव घेतांना तुला दया आली होती का? निरपराधी सज्जनांचा जो छळ करतो, जो त्यांची हत्या करतो, तो दयेला पात्र नाहीं. त्याच्यावर दया करणं म्हणजे सापाला दूध पाजणं आहे. राजवाहनाच्या मृत्यूबद्दल मी तुला देहांत शिक्षा देत आहें."

लगेच तो राक्षसांकडे वळून त्यांना म्हणाला,

"याला वधस्थानीं घेऊन जा. याच्या देहाचे तुकडे तुकडे करून आपापसांत वांटून घ्या. एक दिवस तुम्हाला नरमांसाची मेजवानी होऊं दे!"

त्यावर ते राक्षस म्हणाले,

"महाराज! आमच्यावर कृपा करा. आम्हांला याचं मांस खायला सांगूं नका. हा महापातकी आहे. अधमांतला अधम आहे. याचं मांस खाल्लं तर आमची बुद्धि बिघडेल. आमच्या मनांत विश्वास-घाताचे विचार येऊं लागतील. मित्राचा जीव घेण्याची वासना होईल. अन्नाचा संस्कार मनावर होतो म्हणतात. नका महाराज, ही शिक्षा आम्हांला करूं नका.

विरूपाक्ष हसला. राक्षसांचं बोलणं त्याला मानवलं. आपल्या प्रजेच्या नीतिमत्तेबद्दल त्याला अभिमान वाटला. त्यानं मग म्हटलं, "ठीक आहे. तुम्ही खाऊं नका. पशुपक्षी याला खाऊन फस्त करतील."

राक्षस गौतमाला दरदरां ओढीत स्मशानांतल्या वधस्थानीं आले. विरूपाक्षानं सांगितलेली शिक्षा त्यांनीं ताबडतोब अमलांत आणली. गौतमाच्या देहाचे खंड विखंड इतस्ततः पसरले. घारी–गिधाडं टवकारून पाहूं लागलीं. राक्षस बाजूला होतांच पक्ष्यांची झुंड खालीं उतरली, पण एकानंहि त्या तुकड्यांना स्पर्श केला नाहीं. ते आले तसे भराऱ्या मारीत उडून गेले.

गौतमानं पानांत गुंडाळून आणलेल्या राजवाहनाच्या देहाला विरूपाक्षानं अग्निसंस्कार करायचं ठरवलं. राक्षसांकरवीं त्यानं एक चिता रचवली. तिच्यांत अनेक सुगंधी द्रव्यं टाकलीं आणि सन्मानानं तो मांसाचा गोळा त्या चितेवर ठेवला. विरूपाक्षानं स्वतःच्या हातानं अग्नि लावला आणि अश्रु ढाळले. आग भडकली. फट्फट् आवाज होऊं लागले. ज्वाळा अंतराळांत जाऊं लागल्या.

आणि इतक्यांत एक निराळाच चमत्कार घडून आला. आकाशांतून कसल्या तरी द्रव पदार्थाची धार चितेवर गळली. भडकलेली चिता एकदम विझली आणि तिच्यांतून राजवाहन सजीव होऊन बाहेर पडला. हा काय प्रकार आहे म्हणून विरूपाक्ष आश्चर्य करतो आहे तोंच इंद्र खालीं उतरला. त्याच्या हातांत अमृतानं भरलेली सोन्याची झारी होती, आणि तिच्यांतून धार गळत होती.

राजवाहनानं इंद्राला ओळखलं. सर्वांनीं त्याला प्रणाम केला. आपण ब्रह्मदेवाच्या आज्ञेनं तुला जिवंत करण्यासाठीं इथें आलों असं इंद्रानं सांगितलं. विरूपाक्षानं मग राजवाहनाला गौतमाची सर्व हकीगत

सांगितली व त्याच्या देहाचे जिकडे तिकडे विखुरलेले तुकडे दाखवले. राजवाहनाला तें दृश्य पाहून फार वाईट वाटलं. त्याचं मवाळ मन



कळवळलं. त्यानं एक लांब सुस्कारा सोडला. इतक्यांत इंद्र त्याला म्हणाला:—

"माझं काम झालं. मी आतां परत स्वर्गलोकीं जातों. पण तुला कांहीं तरी देऊन जावं असं माझ्या मनांत आहे. तुला काय हवा असेल तो वर मागून घे!"

"देवा, मला वर देत असशील तर गौतमाच्या देहाचे तुकडे

इथें पसरले आहेत त्यांवर अमृत शिंपून त्याला जिवंत कर!" राजवाहन बोलला.

"छे छे! हें काय भलतंच? त्या अधमाला जिवंत करायचं नांव-सुद्धां काढूं नको. त्यानंच तुझा घात केला होता ठाऊक आहेना? विरूपाक्षानं मधेंच हरकत घेतली.

"हो, ठाऊक आहे; म्हणूनच मी त्याला जिवंत करायला सांगतों. अत्याचाराला अत्याचारानंच उत्तर देणं, जो आपला घात करील त्याचा उलट आपण घात करणं हा व्यवहारी जगाचा धर्म असेल; पण मला तो मान्य नाहीं. द्वेषानं द्वेष मरत नाहीं. आगीनें आग विझत नाहीं. वैरानं वैर शमत नाहीं!! दुष्टाचा दुष्टपणा आणि क्रूराचं क्रौर्य नाहींसं करायला दया आणि क्षमा हेंच प्रभावी औषध आहे. शस्त्रानं आणि बलानं एखाद्याचं शरीर जिंकतां येतं, पण मन जिंकतां येत नाहीं. हृदय काबीज करतां येत नाहीं......... मारायचं असेल तर दयेनं मारावं. वांकवायचं असेल तर उपकाराच्या ओझ्या-खालीं वांकवावं. शत्रूचं अन् अपराध्याचंहि कल्याण करावं म्हणून जी झटेल तीच खरी दया!! या दयेचं सामर्थ्य काय आहे हें पाहायचं असेल तर गौतमाला जिवंत कर!"

हें शेवटचं वाक्य त्यानं इंद्राला उद्देशून उच्चारलं होतं. तें ऐकून इंद्रानं आढेवेढे न घेतां अमृत शिंपडलं. गौतमाच्या देहाचे तुकडे एकत्र जुळले. पूर्ववत् आकार बनला. त्यांत जीव येऊन चेतनाहि उत्पन्न झाली. गौतम एकदम उठून उभा राहिला. त्यानं एकवार सगळीकडे दृष्टि टाकली. तो विरूपाक्ष, तो राजवाहन, ते राक्षस, ही सर्व मंडळी त्यानं ओळखली. हळूहळू त्याची पूर्वस्मृति जागृत झाली. आपण राजवाहनाला मारलं होतं. राक्षसांनीं आपल्याला पकडून आणलं होतं. विरूपाक्षानं आपल्याला देहांत शिक्षा दिली होती. राक्षसांनीं

आपल्याला याच जागीं आणलं होतं. एका क्रूर राक्षसाच्या कुऱ्हाडीचा घाव आपल्या डोक्यावर आदळला होता. एक भयंकर वेदनेची तिडीक माझ्या मस्तकांत उठली होती. पुढें काय बरं ? पुढचं कांहींच आठवत नाहीं. मग मी मेलों असेन का ? अन् मेलों असलों तर आतां जिवंत कसा ? शस्त्राचा एकाहि प्रहार माझ्या अंगावर दिसत नाहीं. मग हें स्वप्न कीं सत्य ........?

गौतम घोटाळ्यांत पडला आहे हें त्या लोकांना कळून आलं. इंद्रानं मग त्याचा भ्रम दूर केला. राजवाहनानं आग्रह धरला म्हणूनच मीं तुला जिवंत केलं असं इंद्र त्याला बोलला.

गौतमानं धांवत जाऊन राजवाहनाचे पाय धरले. त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. किती तरी वेळ तो मूकपणें रडत होता. ते अश्रु पश्चात्तापाचे होते, अन् म्हणूनच पवित्र होते. ते त्याचं हृदय शुद्ध करीत होते, उजळीत होते. त्या अश्रुजलांतून एक निर्मळ मनाचा आणि शुद्ध आचरणाचा मानव तयार होत होता. राजवाहनाच्या निरपेक्ष दयेच्या आविष्कारानं त्याचं दगडी काळीज लोण्याहून मृदु बनलं होतं. थोडा वेळ गेल्यावर सद्गदित कंठानं तो राजवाहनाला एवढंच म्हणाला:—

"कशाला या अधमावर दया केलीत! या जगांत काय उपयोग आहे माझा—"

राजवाहन सांत्वनाच्या शब्दांत त्याला बोलला, "गौतमा! तुझा भूतकाळ काळाकुट्ट असला तरी भविष्यकाळ तुला सदाचरणानं उज्ज्वल करतां येईल. कीर्तीनं धवल करतां येईल! आजवर त्या गौतमाचं हिडीस चरित्र जगानं पाहिलं, आतां या गौतमाचं शुभ्र निष्कलंक चरित्र त्याला पाहूं दे!"

ठाणे, वाचनालय
2402
व.ता.

# मुलांचा नित्यपाठ

पं. महादेवशास्त्री जोशी

या पुस्तकांत प्रातःस्मरण, भूपाळ्या, स्तोत्रें, प्रार्थना आणि कांहीं संस्कृत, प्राकृत सुंदर श्लोक यांचा संग्रह केलेला असून प्रत्येक प्रकाराचें वैशिष्टय सांगितलेलें आहे. प्रत्येक पालकानें हें छोटें पण नमुनेदार पुस्तक मुलांच्या हातीं द्यावें आणि त्यांच्याकडून त्याचें पाठांतर करून घ्यावें. त्यामुळें मुलांच्या वाणीवर आणि मनावर चांगले संस्कार घडतील.

मूल्य ८ आणे.

# नवनीत रामायण

पं. महादेवशास्त्री जोशी

एकनाथ, मोरोपंत, मुक्तेश्वर, श्रीधर, रामदास इत्यादि संतकवींनीं रचलेल्या रामायणांतून निवडक सुंदर भाग घेऊन हें रामायण बनविलेलें आहे. काव्यभाग विषयवारीनें दिला असून, मधला संदर्भाचा कथाभाग चटकदार भाषेंत लिहिलेला आहे. मराठी वाङ्मयाच्या रसिकांनीं आणि रामभक्तांनीं हें रामायण अवश्य संग्रहीं ठेवावें आणि नित्य वाचावें. मुखपृष्ठावर तिरंगी चित्र. मूल्य १॥ रुपया.

ज्ञानराज प्रकाशन, ४२१ शनवार पेठ, पुणें २.


IRBK-0102502

IRBK-0102502

## —प्राचीन सुरस गोष्टी—

# १ महीपाल

भैरवनाथाच्या पुजाऱ्याचीं दोन मुलें. चंद्रा आणि महीपाल. जशीं सुंदर तशींच गुणी. एका दुष्काळांत सांपडून त्यांना आईबापांपासून दूर जावें लागलें. आणि —पण पुढची गोष्ट तुम्ही मूळ पुस्तकांतच वाचा. ती तुमच्या मनाला चटका लावील. मूल्य १० आणे.

# २ उद्धार

दोन महान् ऋषि. एक शांत आणि दुसरा संतप्त. दोघे एकाच तपोवनांत राहत. दोघांच्या मध्यें सांपडली सरस्वती. आणि मग अनेक विचित्र घटना घडल्या. मूल्य ६ आणे.

### वृत्तपत्रांचे अभिप्राय

दोन्ही गोष्टींच्या वाचनानंतर पुढील गोष्टी वाचावयास मिळाव्या अशी मुलांस उत्कंठा लागेल —केसरी

लिहिण्याची पद्धति आकर्षक आहे. —लोकशक्ति

लहान मुलां-मुलींनीं या अवश्य वाचाव्यात. —सकाळ

हल्लींचें ठराविक बाल-वाङ्मय वाचून कंटाळलेल्या मुलां-मुलींनीं व त्यांच्या पालकांनीं हीं दोन्ही पुस्तकें अगत्य वाचावींत. —ध्रुव

ज्ञानराज प्रकाशन, ४२१ शनवार पेठ, पुणें २.